MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता®

International Multilingual Research Journal
Issue-22, Vol-03 April to June 2018

Editor
Dr.Bapu G.Gholap

Principal

13) EFFECT OF HILDA TABA'S (INDUCTIVE THINKIN) MODEL ON ACHIEVEMENT IN .....
MR.IQBAL SINGH, BHUTTA (LUDHIANA) || 60

14) 'Memsahib's journey : Margaret Laurence's *The Prophet's Camel Bell*
Dr. Aditi Hemang Vahla, Vadodara || 63

15) Disastrous Patriarchal Sabotage: Analysing Taslima Nasrin's *French Lover*
Reemani Verma, Kathua, Jammu & Kashmir || 66

16) An Analysis of India's Trade Relations with ASEAN in the Development of......
Dinesh Yadav, Allahabad || 73

17) विदर्भातील दारिद्र्यनिर्मूलन:एक दृष्टिक्षेप
डॉ. मंगेश आचार्य, ता.नरखेड, जि.नागपूर || 80

18) लहान राज्यांचा विकास व मागणी एक परिप्रेक्ष
प्रा. वर्षा वैजनाथराव चंदनशिवे || 87

19) सार्वजनिक सभा एक दृष्टीक्षेप
प्रा. डॉ. वसंत श्रावण देसले, || 91

20) देशातील सामाजिक परिवर्तनासाठी विदर्भातील चळवळी योगदान
डॉ. सचिन जयसवाल, यवतमाळ (महाराष्ट्र) || 94

21) दलित साहित्य:मानवमुक्तीच्या लढयाचा एल्गार
प्रा.के.एम.कांबळे, मंठा, जि.जालना || 98

22) १८५७ च्या राष्ट्रीय उठावातील कोल्हापूरचे योगदान
डॉ. सुनिल शिवमूर्ती रजपूत–रणजित रंगराव पाटील || 101

23) स्त्रीवादी चळवळ व स्त्रीवादी साहित्य
डॉ. कैलास एस. महाले, श्रीरामपूर, जि. अहमदनगर || 104

24) जागतिकीकरण आणि भारतातील शेतजमीनविषयक समस्या
डॉ. मस्के दिलीप सितारात्म, अंबाजोगाई .जि.बीड. || 107

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.62759
Vidyawarta®
April To June 2018
Issue-22, Vol-03


आजचे क्रांतिविज्ञान, या ग्रंथात बाबुराव बागूल म्हणतात दलित साहित्य हे तर माणसाचे साहित्य!

५) दलित साहित्याचे भवितव्य

दलित साहित्य हे सूर्यकुळातले आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा व त्यांनी सुरू केलेल्या मुक्तीसंग्रामाचा सूर्य उगवला नसता तर दलित साहित्याचा जन्मच झाला नसता. गौतमबुध्द, चोखामेळा, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बासाहेब आंबेडकर अशी ही कुलपरंपरा दलित साहित्याला लाभली आहे. साहित्याला श्रेषतव येते ते साहित्याच्या शीलामुळे म्हणजे त्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या मूल्यवान अनुभवामुळे, स्थळकाळाचे भान असल्यामुळे, अनुभवाची भाषा गवसल्यामुळे. दलित साहित्याला आपले शील गवसले आहे. झोपडी झोपडीतून आता सूर्य पेटला आहे. जोपर्यंत अन्याय अत्याचार करणारे आहेत त्याच ताकदीने त्याचा प्रतिकार करणारेही आहेत. म्हणून समतेचा ध्वज उंच धरून स्वत्वाचा उदयोस्तू करणारे दलित साहित्य सम्यक क्रांतीचे नेतृत्व करील यात तिळमात्र शंका नाही. त्याचे कारण म्हणजे दलित साहित्याची बांधीलकी मुलभूत आणि शासस्वत जीवन मुल्यांशी आहे.

संदर्भ:—

१) दलित काव्य दर्शन—संपादक नारायण सुर्वे
२) दलित चळवळ आणि साहित्य—डॉ.कृष्णा किरवले
३) दलित साहित्य आजचे क्रांतिविज्ञान—बाबुराव बागूल
४) वैजयंता--अण्णाभाऊ साठे
५) डॉ.सुरेश पैठणकर--साहित्य, समाज आणि संस्कृती.

❑❑❑

22

# १८५७ च्या राष्ट्रीय उठावातील कोल्हापूरचे योगदान

डॉ. सुनिल शिवमूर्ती रजपूत
इतिहास विभाग प्रमुख
जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
अणदूर, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

रणजित रंगराव पाटील
संशोधक विद्यार्थी

*********

## प्रस्तावना

भारतीय क्रांतिकारकांनी देशाच्या विविध भागात ब्रिटीशांच्या विरोधी सन १८५७ साली उठाव घडवून आणले. या उठावाची ठिणगी कोल्हापूरातही पडली होती. या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यात तत्कालीन संस्थानातील लोकांनी देखील उठाव करून आपला सहभाग नोंदविला होता. तत्कालीन कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती बाबासाहेब महाराजांच्या भावाने म्हणजेच चिमासाहेब महाराजांनी ब्रिटिशांविरूद्ध उठाव करण्याची योजना आखली होती. चिमासाहेब एक स्वाभिमानी, धाडसी आणि निष्ठावान राष्ट्रवादी होते आणि त्यांनी कोल्हापूरच्या आसपासच्या ग्रामीण भागातून क्रांतिकारकांची लढाऊ टीम तयार केली होती. यापुर्वी ब्रिटीशांविरोधी उठाव कोल्हापूर, पश्चिम महाराष्ट्रात आणि कर्नाटकातील काही भागात झाले होते; पण इंग्रजांनी ते उधळून लावले होते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सन १८५७ च्या राष्ट्रीय उठावातील कोल्हापूरच्या योगदानाचा आढावा घेण्यात आलेला आहे.

## उठावापूर्वीची पार्श्वभूमी

३१ डिसेंबर १६०० रोजी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. प्राचीन... खंडात



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

व्यापार करण्याच्या उद्देशाने भारतात आलेल्या या कंपनीने व्यापारात आपला जम बसल्यानंतर भारताच्या राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रांमध्ये हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली. अवघ्या काही काळातच इंग्रजांनी भारतीय सत्ताधिशाकडे असलेल्या एकीच्या अभावाचा फायदा घेऊन शेकडो राजे—राजवाड्यांना आपले मांडलिक बनवून संपूर्ण हिंदुस्थानावर आपले वर्चस्व स्थापन केले. २ जून १८१८ रोजी मराठा राज्याचा पेशवा बाजीराव दुसरा यांनी खानदेशातील धुळकोट येथे इंग्रजांपुढे शरणागती पत्करली आणि मराठ्यांचे म्हणजेच पेशव्यांचे राज्य ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या साम्राज्यात विलिन झाले. माऊंट स्टुअर्ट एलफिस्टनची या भागावर 'गव्हर्नर' म्हणून नियुक्ती करण्यात आली.

कोल्हापूरचे राजे म्हणून यावेळी शहाजी उर्फ बुवासाहेब राज्यकारभार पाहत होते. बुवासाहेबांचे जेष्ठ पुत्र तिसरे शिवाजी उर्फ बाबासाहेब यांचा जन्म १६ डिसेंबर १८३० रोजी तर कनिष्ठ पुत्र शाहू उर्फ चिमासाहेब यांचा जन्म ८ जानेवारी १८३१ रोजी झाला होता. बाबासाहेब स्वभावाने नेमस्त वृत्तीचे होते; पण चिमासाहेब मात्र जहाल होते. शहाजी उर्फ बुवासाहेब हे २९ नोव्हेंबर १८३८ रोजी मयत झाले. त्यावेळी त्यांची दोन्ही मुले बाबासाहेब व चिमाजी अल्पवयी असल्याने राण्यांनी (जिजाबाई व दिवाणबाई) राज्य कारभार पहावयाचा; पण त्यांचे अंतर्गत कलह असल्यामुळे इंग्रजांनी तहातील कलमानुसार राज्यकारभार सुधारण्यासाठी दाजी कृष्ण पंडित यास कोल्हापूरचे दिवाण नेमले. कोल्हापूर संस्थानाचा कारभार प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे इंग्रजांकडे गेला. जनतेला हे धोरण योग्य वाटले नाही. त्यातच दाजी पंडिताने दरबारातील अधिकाऱ्यांच्या इच्छेविरूद्ध बऱ्याच सुधारणा केल्या. त्यामुळे इंग्रजांविषयी कटूता वाढली व त्याचा स्फोट इ.स. १८४४ मध्ये गडकरी उठावात झाला. मराठा राज्यात किल्ल्यातील बंदोबस्त गडकरी ठेवीत होती. त्यांना किल्ल्याच्या जवळपासच्या मुलुख तनख्यासाठी लावून दिले असत. इंग्रजांची सत्ता आल्यानंतर त्यांना किल्ल्याच्या रक्षणासाठी गडकरींची गरज राहिली नाही. त्यांच्याकडील जमिनी मात्र त्यांच्याकडेच ठेवण्यात आल्या. त्यांचा शेतसारा सरकारात भरावा असे ठरले. दाजी पंडित यांनी शेतसारा वसुलीसाठी मामलेदाराची नेमणूक केली. मामलेदार गडकऱ्यांपेक्षा पदाने कमी असल्याने गडकरी नाराज झाले. यातूनच गडकरी आणि कारभारी मंडळी यांच्यात पेच निर्माण झाला. सामानगडावर वसुलीसाठी आलेल्या मामलेदारांच्या माणसांना वसूल देण्याचे गडकऱ्यांनी नाकारले. ह्या गडकऱ्यांना शिक्षा केलीच पाहिजे. हे दाजी पंडिताने ठरवून बेळगावहून इंग्रजी सैन्य आणले व गडकऱ्यांना सामानगड खाली करण्याचा आदेश दिला. कंपनी सरकारने कॅप्टन औटरॅम यांच्या नेतृत्त्वाखाली १२०० लष्करासह सामानगडावर हल्ला केला; पण गडकऱ्यांनी इंग्रजांचा पराभव केला. ऑक्टोबर १८४४ मध्ये बंडवाल्यांनी प्रतिसरकारची स्थापना केली व दाजी पंडित यास पकडून कोल्हापूरचा ताबा घेतला. सुभाना निकम ५०० बंडवाल्यासह सामानगडाला गेला व त्याने कोल्हापूराशी असलेले दळणवळण तोडले. बंडवाल्यांनी पन्हाळा व पावनगड जिंकले. विशाळगडचे लोक बंडवाल्यात सामील झाले. या गडकऱ्यांच्या बंडात राजदरबारातील लोकही सामील होते. त्यांनी चिकोडीचा खजिना लुटला. कैद्यांची सुटका केली व सरकारी कागदपत्रे जाळली. १३ ऑक्टोबर १८४४ रोजी बंडवाल्यांनी सामानगड ताब्यात घेतला. इंग्रजांनी सामानगडावर हल्ला केला; पण गडकऱ्यांना कोल्हापूरहून मदत न मिळाल्याने १३ ऑक्टोबर १८४४ रोजी शरण आले. हा उठाव कंपनी सरकारने सैन्य बळावर चिरडून टाकला.

### कोल्हापूरमधील पहिला उठाव

सन १८५७ च्या उठावाची तीव्रता उत्तरेत इंग्रजांविरूद्ध एतद्देशीय राजे—रजवाडे व संस्थानिक तसेच सर्वसामान्य जनता आणि इंग्रजांच्या फलटणीतील भारतीय सैनिक यांनी व्यापक उठाव केल. या उठावाचे नेतरत्व विठूरचे नानासाहेब पेशवे यांच्याकडे होते. त्यांनी भारतातील सर्व संस्थानिकांना उठाव करण्याविषयी पत्रे दिली. तसेच एक पत्र कोल्हापूरच्या संस्थानातही आले; पण बाबासाहेबांच्या



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.62759
Vidyawarta®
April To June 2018
Issue-22, Vol-03


हातात सत्ता नव्हती व त्यांचा स्वभाव नरम होता; परंतु बाबासाहेबांचे धाकटे बंधू चिमासाहेबाने ते पत्र वाचून काय करायचे ते मनोमन ठरविले. तसेच ग्वाल्हेरहून ज्योतिराव उर्फ भाऊसाहेब घाटगे याला कोल्हापूरच्या राजाला उठावासाठी तयार करण्यासाठी पाठविले. हे जून १८५७ मध्ये कोल्हापूरचे धाकटे राजे चिमासाहेबांस भेटले व त्यांनी चांदीची मुळ व मौल्यवान पाते असलेली तलवार भेट दिली. बळवंतराव नाईक निंबाळकर हा सरदार सत्ताविसाव्या फलटणीत सारखी ये–जा करीत होता व त्याने फलटणीस उठाव करण्यास तयार केले. धाकटे राजे चिमासाहेब यांच्याकडूनही मोजक्या माणसांची ये–जा या फलटणीकडे गुप्तपणे सुरू होती. दरम्यान 'वर्तमानदीपिका' व 'वृत्तसार' या मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या मराठी वृत्तपत्रांनी उत्तरेकडील उठावाच्या बातम्या देऊन दक्षिणेतील सैनिकांना चितावले. तसेच नानासाहेब पेशवा फौजा घेऊन दक्षिणेत येणार असल्याची भित्तीपत्रके पुणे येथे आढळून आली. २७ व्या फलटणीतील २०० शिपायांनी ३१ जुलै १८५७ रोजी रामजी शिरसाट यांच्या नेतृत्त्वाखाली उठाव केला. त्यांनी मेजर सेलँड या लष्करी अधिकाऱ्यांच्या निवासस्थानावर हल्ला केला. यानंतर बंडखोर सैनिकांनी सैन्याचा खजिना, दारूगोळा व कॅंटोनमेंट बाजार लुटला. १ ऑगस्ट १८५७ रोजी सकाळी १२५ सैनिक राजाला भेटण्यासाठी निघाले. राजाने वेशीचे दरवाजे उघडण्यास नकार दिल्याने ते राधाकृष्णाच्या मंदिरात शिरले. यानंतर क्रांतीसैनिक सावंतवाडीकडे गेले. पुढे ३ ऑगस्ट १८५७ रोजी सोळांकूर येथे ३ इंग्रज अधिकाऱ्यांना ठार केले. हा उठाव मोडण्यासाठी ३ ऑगस्ट १८५७ रोजी लेफ्टनंट केर हा साताऱ्याहून ससैन्य कोल्हापूरला आला. यानंतर ग्रँट जेकब हे स्पेशल कमिशनर म्हणून कोल्हापूर येथे आले. त्यांनी क्रांतिकारी सैनिकांना पकडून शिक्षा देण्यास सुरुवात केली. क्रांतिकारी सैन्यापैकी ८ जणांना तोफेच्या तोंडी देण्यात आले. २ फासावर चढविले तर ५१ सैनिकांना गोळ्या घालून ठार केले. अनेकांवर खटले भरले. रामजी सिरसाट यास पकडून देणाऱ्यास सावंतवाडी व कोल्हापूर येथील सुपरिटेंडेन्ट यांनी ३०० रुपयांचे बक्षीस जाहीर केले. शेवटी कुडाळ पेठ्यातील पावशी येथील जंगलात तो पोलीसांच्या गोळीत बळी पडला.

## कोल्हापूरमधील दुसरा उठाव

३१ जुलै १८५७ रोजी रामजी सिरसाटच्या नेतृत्त्वाखाली उठाव ब्रिटिशांनी मोडून काढला. या उठावास चिमासाहेब सहकार्य करतील अशी आशा होती; पण ती झाली नाही. कारण भावाविरूद्ध म्हणजेच तिसरे शिवाजी यांच्याविरूद्ध बंड करण्याची त्यांची इच्छा नव्हती. क्रांतिकारकांनी कोल्हापूर राज्याचे कारभारी अप्पा फडणीस व तात्या मोहिते यांना कोल्हापूरच्या उठावाच्या कटात सहभागी करून घेतले होते. कोल्हापूर शहराचे संरक्षण करणारा इंग्रज अधिकारी कॅप्टन ग्रँड अँबर याला चकवा देऊन क्रांतिकारांनी तटावरून शहरात प्रवेश करून ५ डिसेंबर १८५७ रोजी राजवाडा ताब्यात घेतला. कॅप्टन ग्रँड अँबर याने कॅप्टन थॉम्बसन व कॅप्टन शेनिडर यांच्या मदतीने क्रांतिकारकांवर हल्ला सुरू केला. यात क्रांतिकारकांचा नेता फिरंगोजी शिंदे मारला गेला. त्यामुळे क्रांतिकारकांच्यात गोंधळ उडाला. यावेळी इंग्रजांनी पांढरा बावटा घेऊन शरणागतीचे नाटक करून राजवाड्यात प्रवेश केला. त्यावेळी शेनिडर व कोल्हापूरचे राजे बाबासाहेब यांच्यात चर्चा झाली. त्यानुसार क्रांतिकारकांना शस्त्रे खाली ठेवण्याची सूचना झाली. कॅप्टन अँबरने राजवाड्यातच कोर्ट भरवून ३६ क्रांतिकारकांना फाशी दिली व बंड मोडून काढले. या बंडामागे चिमासाहेब असावेत असा संशय इंग्रजांना होता; पण पुरावा नव्हता. त्यांनी त्यांच्याकडे तशी चौकशीही केली; पण त्यांनी आपण निर्दोष असल्याचे स्पष्ट केले; पण इंग्रजांना ते खरे वाटले नाही. मार्च १८५७ च्या शेवटच्या आठवड्यात जनरल जेकबला वाटले की, चिमासाहेबांना मोकळे राहू देणे धोक्याचे आहे. कदाचित ते पुन्हा लोकांच्या मनात इंग्रजांविरूद्ध उठाव करण्याच्या भावना जागृत करतील म्हणून त्याने चिमासाहेबांना पकडून दूर पाठवून देण्याचे ठरविले. ३१ मार्च १८५८ रोजी त्यांना अटक केली व कराची (पाकिस्तान) येथे समुद्रमार्गे पाठविले.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

MAH MUL/03051/2012 ISSN: 2319 9318 UGC Approved Sr.No.62759 Vidyawarta® | April To June 2018 Issue-22, Vol-03 | 0104

त्यामुळे भारतातील इतरत्र ठिकाणी झालेल्या उठावाची जी स्थिती झाली तीच स्थिती कोल्हापूर संस्थानातील उठावाची झाली व उठाव पूर्णत्वास गेला नाही.

### समारोप

प्रारंभी कोल्हापूर संस्थान हे स्वतंत्र व सार्वभौम असे होते. भारतात ब्रिटिश सत्तेचा उदय झाला आणि भारतातील इतर संस्थानाप्रमाणे कोल्हापूर हे संस्थानसुद्धा ब्रिटिशांचे मांडलिक संस्थान बनले. १९ व्या शतकात या ब्रिटिश सत्तेविरोधी उठावाचे लोण संपूर्ण भारतभर पसरले आणि काही कालावधीतच हे कोल्हापूर संस्थानात देखील ब्रिटिश सत्तेविरोधी मोठ्या स्वरूपाचा उठाव घडून आला.

### संदर्भ सूची


१. खोबरेकर वि. गो.–महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे (१८१८ ते १८८४)
२. गर्गे, स. मा.--करवीर रियासत (२००३)
३. गर्गे, स. मा.–करवीर रियासतीची कागदपत्रे खंड ३.
४. गर्गे, स. मा., वर्टीकर श. ह.–कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास, पुणे, १९७४.
५. गुजर मा. वि.--करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने, पुणे, १९६२..
६. झांबरे स. ध.--महान भारतीय क्रांतीकारक (१७७० ते १९००)
७. शिंदे खंडेराव--कोल्हापूर राज्याचा इतिहास (१८३८ ते १८९४)
८. मोडक बा. प्र.–कोल्हापूर प्रांताचा इतिहास (१८९३)


❑❑❑

23

# स्त्रीवादी चळवळ व स्त्रीवादी साहित्य


डॉ. कैलास एस. महाले
सहाय्यक प्राध्यापक
पदव्युत्तर मराठी अध्ययन व संशोधन केंद्र
रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय,
श्रीरामपूर, जि. अहमदनगर


*********

### पार्श्वभूमी–

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशासंबंधीचे, समाजासंबंधीचे सर्व प्रकारचे निर्णय घेण्याचे अधिकार आपल्याला प्राप्त झाले. भारतीय समाज आणि माणसांच्या मनातील राजकीय आकांक्षा वाढल्या. एका नव्या भारताच्या उभारणीचे स्वप्न आपण पाहिले. यातच पुढे १९५० साली आपण आपल्या देशाची राज्यघटना स्वीकारली. भारतीय इतिहासातील ही एक मौलिक घटना आहे. भारतीय राज्यघटनेने सर्वांना समान अधिकार दिले. स्त्री–पुरुष, उच्च–नीच असे भेद मानायचे नाहीत ही शिकवण दिली, त्यामुळे स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या गोष्टी या काळात महत्त्वाच्या ठरल्या. लोकशाही शासनपद्धतीमुळे सर्वसामान्य माणसाला हक्क अधिकाराची भाषा कळायला लागली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपले सर्व प्रश्न सुटतील ही अपेक्षा ते बाळगुन होते. पण काळाबरोबर अनेक समस्या वाढत गेल्या. दारिद्र्य, बेकारी, लोकसंख्येचा विस्फोट, भ्रष्टाचार, दुष्काळ, जातीय राजकारण यामुळे सामान्य माणसाचा स्वातंत्र्य आणि लोकशाहीवरील विश्वास उडाला. आपल्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ते चळवळीच्या रुपाने एकत्रित येऊन संघर्ष करु लागले. शिक्षण आणि लोकाशाहीचा विचार अनेक सामाजिक घटकांपर्यंत पोहचल्यामुळे शहराबरोबर खेड्यापाड्यातील दलित, भटके-विमुक्त, आदिवासी आणि शेतकरी तसेच स्त्रिया व कामगार जागृत झाले. शैक्षणिक विकासामुळे जनमानसात माणुसकीची भावना रुजलेली असली तरी दुसरीकडे सामाजिक क्षेत्रातील



Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.